गोपनीय/अतितात्काळ

क्र. पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०१६/२४/२०१६
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,**
**शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,**
**मुंबई- ४०० ००१.**
दिनांक :- ०८/०६/२०१६.

-: **आदेश** :-

शासन आदेश, गृहविभाग क्र. रापोसे १७१६/प्र.क्र. १९७(२)/पोल-१ (अ) दिनांक ०७/०६/२०१६ अन्वये खालील नमूद पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) यांची त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदली करण्यास शासनाने मान्यता दिली आहे :-

| अ.क्र. | पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्तांचे नांव | सध्याची नियुक्ती | बदलीवरील नवीन नियुक्ती |
|---|---|---|---|
| १. | शिवाजी पंडीतराव पवार | उपविभागीय पोलीस अधिकारी, सिरोंचा उपविभाग, गडचिरोली | सहायक पोलीस आयुक्त, पुणे शहर |
| २. | रमेश धुमाळ | उपविभागीय पोलीस अधिकारी, अहेरी उपविभाग, गडचिरोली | सहायक पोलीस आयुक्त, ठाणे शहर |
| ३. | बाजीराव मोहिते | राज्य गुप्तवार्ता विभाग (बदली आदेशाधिन) | उपविभागीय पोलीस अधिकारी, सिल्लोड उपविभाग, औरंगाबाद ग्रामीण |
| ४. | सुहास बावचे | उपविभागीय पोलीस अधिकारी, मिरारोड उपविभाग, ठाणे ग्रामीण | उपविभागीय पोलीस अधिकारी, सांगली उपविभाग, सांगली |
| ५. | केशव पातोंड | उपविभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगांव उपविभाग, जळगांव | उपविभागीय पोलीस अधिकारी, पाचोरा उपविभाग, जळगांव |

२. श्री. रमेश मोना गावीत, हे सध्या कार्यरत असलेल्या पदावर संदर्भाधिन शासन आदेशांन्वये श्री. केशव पातोंड, उपविभागीय पोलीस अधिकारी यांची बदली दर्शविण्यात आल्याने घटक प्रमुखांनी श्री. रमेश गावित यांना सध्याच्या पदावरुन **कार्यमुक्त करुन त्यांना पुढील आदेशांची प्रतीक्षा करण्याविषयी सूचीत करवे,**

**३.** **महाराष्ट्र** अध्यादेश क्र. ३, दिनांक १ फेब्रुवारी २०१४, मधील कलम २२ न (२) मधील तरतुदींच्या अनुषंगाने, पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील अधिका-यांच्या बदल्याबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याव्दारे कळविण्यात येत आहेत.

४. **घटक** प्रमुखांना विनंती करण्यात येतेकी,

**अ.** **संदर्भाधिन** शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

**आ.** बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणासंदर्भात मा.न्यायालयाचे / न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

**इ.** सदर बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिका-यांना **व्यक्तिशः** अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास

पाठवावी.

ई. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यांना बदलीवर **तात्काळ कार्यमुक्त करुन त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदांवर तातडीने हजर होण्याच्या सूचना देऊन** अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उ. सदर बदलीच्या आदेशांमुळे ज्या जागा रिक्त होणार आहेत, त्या ठिकाणांचा कार्यभार संबंधीत घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातील इतर पोलीस उपअधीक्षकांकडे सोपवावा.

ऊ. **उपरोक्त** आदेशाच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यांना त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६/०९/१९८३, ११/०१/१९८४ व दि. १०/०२/१९९१ तसेच क्र. पोमसं/३/५५०७/६/९७, दिनांक १३/०२/१९९७ च्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, ठाणे शहर / पुणे शहर.
अपर पोलीस महासंचालक (का. व सु), मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण / जळगांव / सांगली / औरंगाबाद ग्रामीण / गडचिरोली.

प्रत :

विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र / कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई / औरंगाबाद परिक्षेत्र / कोल्हापूर परिक्षेत्र / नागपूर परिक्षेत्र
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

प्रत :-

जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे / जळगांव / सांगली / औरंगाबाद / गडचिरोली.
पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, १४-अ, ३६, ४०.
**पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष**

२. प्रस्तुत बदलीचे आदेश **"पोलीस उपअधीक्षकांच्या बदल्या"** या शिर्षाखाली महाराष्ट्र पोलीस दलाच्या संकेत स्थळावर पुढील पंधरा दिवसांसाठी प्रसिध्द करावे.